भारत सरकार

**विधि, न्याय व कंपनीकार्य मंत्रालय**

सत्यमेव जयते

# प्राण्यांना क्रूरतेने वागवण्यास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम, १९६०

**( १९६० चा अधिनियम क्रमांक ५९)**

[दिनांक ३० मार्च, २००१ रोजी यथाविद्यमान]

# The Prevention of Cruelty to Animals Act, 1960

**(Act No. 59 of 1960)**

**[ As in force on the 30th March, 2001]**

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी
भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले
२००४

**[ किंमत : रु. ६.०० ]**

## प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक ३१ मार्च, २००१ रोजी यथाविद्यमान असलेल्या दि प्रिव्हेंशन ऑफ क्रूएल्टी टू ॲनिमल्स ॲक्ट, १९६० याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ **भारताचे राजपत्र** असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड १२, अंक २, दिनांक २८ ऑगस्ट, २००३ यात पृष्ठ १२७ ते १४० मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २ खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली,
दिनांक २८ ऑगस्ट, २००३,

**डॉ. सुभाषचंद्र जैन,**
सचिव, भारत सरकार.

---

## PREFACE

This edition of the Prevention of Cruelty to Animals Act, 1960 as on the 30th March 2001 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in *Gazette of India*, Extraordinary Part-XII, Section-1, No. 2, Volume 12, dated 28th August, 2003 on pages 127 to 140.

This authoritative text was published under the authority of the President under Section 2, Clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

Dr. SUBHASH C. JAIN,
Secretary to the
Government of India.

New Delhi,
Dated 28th August, 2003.

# प्राण्यांना क्रूरतेने वागवण्यास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम, १९६०

## कलमांचा क्रम


### प्रकरण एक

कलमे

### प्रारंभिक

१ संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.

२ व्याख्या.

३. प्राण्यांचा प्रभार असणाऱ्या व्यक्तींची कर्तव्ये.

### प्रकरण दोन

### भारताचे प्राणी कल्याण मंडळ

४. प्राणी कल्याण मंडळाची स्थापना.

५. मंडळाची घटना.

५क. मंडळाची पुनर्घटना.

६. मंडळाच्या सदस्यांचा पदावधी आणि त्यांच्या सेवाशर्ती.

७. मंडळाचा सचिव आणि अन्य कर्मचारी.

८. मंडळाची निधि.

९. मंडळाची कार्ये.

१०. विनियम करण्याची मंडळाची शक्ती.

### प्रकरण तीन

### प्राण्यांना क्रूरतेने वागविणे

११. प्राण्यांना क्रूरतेने वागविणे.

१२. फुका किंवा डूमदेव करण्याबद्दल शिक्षा.

१३. यातना होत असलेल्या प्राण्याचा नाश करणे.

### प्रकरण चार

### प्राण्यांवर प्रयोग करणे.

१४. प्राण्यांवर प्रयोग करणे.

१५. प्राण्यांवरील प्रयोग करण्यावर नियंत्रण आणि देखरेख ठेवण्याकरिता समिती.

१५. उपसमित्या.

१६. समितीचा कर्मचारी वर्ग.

१७. समितीची कर्तव्ये आणि प्राण्यांवर प्रयोग करण्यासंबंधी नियम करण्याची समितीची शक्ती.

१८. प्रवेश आणि तपासणी करण्याची शक्ती.

१९. प्राण्यांवर प्रयोग करण्यास मनाई करण्याची शक्ती.

२०. शास्ती.

### प्रकरण पाच

### खेळ करणारे प्राणी

२१. "प्रदर्शित करणे" व "प्रशिक्षण देणे" यांच्या व्याख्या.

२२. खेळ करून दाखवणाऱ्या प्राण्यांचे प्रदर्शन व प्रशिक्षण यावर निर्बंध.

२३. नोंदणी करण्याची पद्धती.

२४. खेळ करणाऱ्या प्राण्यांचे प्रदर्शन व प्रशिक्षण याला मनाई करण्याची किंवा त्यावर निर्बंध घालण्याची न्यायालयाची शक्ती.

२५. जागेत प्रवेश करण्याची शक्ती.

२६. अपराध.

२७. सूट.

**प्रकरण सहा**

**संकीर्ण**

२८. धर्मानि विहित केलेल्या ठार मारण्याच्या पद्धतीसंबंधीची व्यावृत्ती.
२९. सिद्ध दोषी व्यक्तीला प्राण्यांच्या मालकीपासून वंचित ठेवण्याची न्यायालयाची शक्ती.
३०. विवक्षित प्रकरणी दोषी असण्याचे गृहीतक.
३१. अपराधांची दखल पात्रता.
३२. झडती घेण्याच्या किंवा अभिग्रहणाच्या शक्ती.
३३. झडतीचे अधिपत्र.
३४. परीक्षणासाठी अभिग्रहण करण्याची सर्वसाधारण शक्ती.
३५. प्राण्यांवर उपचार करणे व त्यांची काळजी घेणे.
३६. खटला भरण्यावरील मर्यादा.
३७. शक्तीचे प्रत्योयाजन.
३८. नियम करण्याची शक्ती.
३८क. संसदेपुढे ठेवावयाचे नियम व विनियम.
३९. कलम ३४ अन्वये प्राधिकृत केलेल्या व्यक्ती लोकसेवक असणे.
४०. क्षतिपूर्ती.
४१. १८९० चा अधिनियम ११ याचे निरसन.

# प्राण्यांना क्रूरतेने वागवण्यास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम, १९६०

## (सन १९६० चा अधिनिय क्रमांक ५९)

(३० मार्च, २००१ रोजी यथाविद्यमान) [२६ डिसेंबर, १९६०]

**प्राण्यांना उगीचच वेदना किंवा यातना देण्यास प्रतिबंध करण्यासाठी आणि त्या प्रयोजनार्थ प्राण्यांना क्रूरतेने वागविण्यास प्रतिबंध करण्याशी संबंधित कायद्याचे विशोधन करण्यासाठी अधिनियम.**

भारतीय गणराज्याच्या अकराव्या वर्षी संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :—

### प्रकरण एक

### प्रारंभिक

१. (१) या अधिनियमास, "प्राण्यांना क्रूरतेने वागवण्यास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम, १९६०" असे म्हणता येईल. संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.

(२) त्याचा विस्तार जम्मू व काश्मीर राज्य खेरीजकरून संपूर्ण भारतभर आहे.

(३) केंद्र सरकार, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास तो अंमलात येईल व वेगवेगळ्या राज्यांसाठी आणि या अधिनियमात [१] अंतर्भूत असलेल्या वेगवेगळ्या उपबंधांसाठी वेगवेगळे दिनांक नियत करता येतील.

२. या अधिनियमामध्ये संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर,— व्याख्या.

(क) "प्राणी" याचा अर्थ, मानवाहून अन्य असा कोणताही सजीव प्राणी, असा आहे ;

[२][(ख) "मंडळ" याचा अर्थ कलम ४ अन्वये स्थापन केलेले आणि कलम ५ क अन्वये वेळोवेळी पुनर्घटित केल्याप्रमाणे असणारे मंडळ, असा आहे ;]

(ग) "बंदिस्त प्राणी" याचा अर्थ ज्याला बंदिस्त किंवा परिरुद्ध करून ठेवले असेल मग ते कायमचे असो किंवा तात्पुरते असो किंवा त्याला बंदिस्त किंवा परिरुद्ध अवस्थेतून निसटून जाण्यापासून अडथळा आणण्याच्या किंवा प्रतिबंध करण्याच्या प्रयोजनार्थ कोणत्याही उपयंत्राच्या किंवा यंत्रकाच्या अधीन असलेला किंवा ज्याच्या मुसक्या बांधून ठेवलेल्या आहेत किंवा जो विकलांग असल्याचे दिसून येते, असा कोणताही (पाळीव नसलेला) प्राणी, असा आहे ;

(घ) "पाळीव प्राणी" याचा अर्थ, माणसाच्या उपयोगाचे कोणतेही प्रयोजन साध्य करण्यासाठी जो पुरेसा माणसाळवलेला आहे किंवा ज्याला माणसाळवले आहे किंवा माणसाळवण्यात येत आहे किंवा जरी त्याला अशाप्रकारे माणसाळवले नसेल किंवा माणसाळवण्यात येत नसेल किंवा माणसाळवण्याचा उद्देश नसेल, तरी जो वस्तुत: पूर्णत: किंवा अंशत: माणसाळवला गेला आहे किंवा ज्याला माणसाळवण्यात आले आहे, असा कोणताही प्राणी, असा आहे ;

(ङ) "स्थानिक प्राधिकारण" याचा अर्थ, एखाद्या विनिर्दिष्ट स्थानिक क्षत्रातील कोणत्याही बाबींचे नियंत्रण व प्रशासन जिच्याकडे त्या काळी कायद्याद्वारे विनिहित केलेले असेल अशी नगरपालिका समिती, जिल्हा मंडळ, किंवा अन्य प्राधिकरण, असा आहे ;

(च) "मालक" या शब्दाचा पशूंच्या संदर्भात उपयोग करताना त्यामध्ये केवळ मालकच नव्हे तर, त्या त्या काळी कब्जात किंवा अभिरक्षेत असणारी अन्य कोणतीही व्यक्ती मग मालकाची संमती असो किंवा नसो अंतर्भूत असेल ;

(छ) "फुका किंवा डूमदेव" यामध्ये दुभत्या प्राण्यांतील कोणताही दुभत्याच्या स्राव काढून टाकण्याच्या उद्देशाने त्या दुभत्या मादी प्राण्याच्या आंचळात हवा किंवा कोणताही पदार्थ सोडण्याच्या कोणत्याही प्रक्रियेचा समावेश आहे ;

(ज) "विहित" याचा अर्थ, या अधिनियमान्वये केलेल्या नियमाद्वारे विहित केलेले, असा आहे ;

(झ) "रस्ता" यामध्ये, कोणताही मार्ग, सडक, गल्ली, चौक, आवार, बोळ, खुला मार्ग, खुली जागा, मग ते सर्व रहदारीचे असोत किंवा नसोत जिथे लोकांना प्रवेश असेल, समाविष्ट आहे.

३. कोणत्याही प्राण्याची देखभाल करणाऱ्या किंवा त्याचा प्रभार असणाऱ्या व्यक्तीचे, असे प्राणी सुस्थितीत आहेत हे सुनिश्चित करण्यासाठी सर्व वाजवी उपाय योजणे आणि अशा प्राण्याला उगीचच होणाऱ्या वेदना किंवा यातना देण्यास प्रतिबंध करणे, हे कर्तव्य असेल. प्राण्यांचा प्रभार असणाऱ्या व्यक्तीं कर्तव्ये.

---

१. कलम १ (३) खालील अधिसूचनेसाठी जोडपत्र पहा.

२. १९८२ चा अधिनियम २६, कलम २ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले ( ३० जुलै, १९८२ रोजी व तेव्हापासून).

## प्रकरण दोन

### [भारताचे प्राणी कल्याण मंडळ]

प्राणी कल्याण मंडळाची स्थापना. ४. (१) प्राण्यांच्या कल्याणाला सर्वसाधारणत: उत्तेजन देण्यासाठी आणि पशूंना उगीचच होणाऱ्या वेदना व यातना यांपासून त्यांचे संरक्षण करण्याच्या प्रयोजनार्थ, विशेषत: या अधिनियमाच्या प्रारंभानंतर, होईल तितक्या लवकर केंद्र सरकारकडून [2][ भारताचे प्राणी कल्याण मंडळ] या नावाचे एक मंडळ स्थापन करण्यात येईल.

(२) मंडळ, हा या अधिनियमाच्या उपबंधांच्या अधीनतेने संपत्ती संपादन करण्याच्या, धारण करण्याच्या आणि ती निकालात काढण्याच्या शक्तींसह अखंड परंपरा व सामाईक मोहोर असलेला एक निगमनिकाय असेल आणि त्या नावाने, तो दावा लावील व त्याच्याविरूद्ध दावा लावण्यात येईल.

मंडळाची घटना. ५. (१) मंडळ, पुढील व्यक्तींचे मिळून बनलेले असेल :—

(क) वन महानिरीक्षक, भारत सरकार, पदसिद्ध ;

(ख) पशुसंवर्धन आयुक्त, भारत सरकार, पदसिद्ध ;

[3][(खक) केंद्र सरकारने नियुक्त करावयाच्या अनुक्रमे गृह कार्य व शिक्षण यांचा व्यवहार पाहणाऱ्या केंद्र सरकारच्या मंत्रालयाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या दोन व्यक्ती ;

(खख) केंद्र सरकारने नियुक्त केलेली भारतीय वन्य जीव मंडळाचे प्रतिनिधित्व करणारी एक व्यक्ती ;

(खग) केंद्र सरकारच्या मते प्राणी कल्याण कार्यात ज्या सक्रिय गुंतलेल्या आहेत व ख्यातनाम मानवतावादी आहेत किंवा असलेल्या अशा, केंद्र सरकारने नामनिर्देशित करावयाच्या तीन व्यक्ती ; ]

(ग) केंद्र सरकारच्या मते ज्यांचे प्रतिनिधित्व मंडळावर असणे आवश्यक असेल अशा पशुवैद्यक व्यवसायींच्या संघटनेचे प्रतिनिधित्व करणारी, त्या संघटनेकडून विहित पद्धतीने निवडावयाची एक व्यक्ती ;

(घ) आधुनिक व देशी वैद्यक पद्धती या व्यवसायींचे प्रतिनिधित्व करणाऱ्या, केंद्र सरकारने नामनिर्देशित करावयाच्या दोन व्यक्ती ;

[4][(ङ) केंद्र सरकारच्या मते, मंडळावर प्रतिनिधित्व असावयास पाहिजे अशा दोन महानगरपालिकांपैकी प्रत्येक नगरपालिकेचे प्रतिनिधित्व करणारी, उक्त महानगरपालिकांपैकी प्रत्येक महानगरपालिकेने विहित केलेल्या रीतीने निवडावयाची एक व्यक्ती ;]

(च) केंद्र सरकारच्या मते, मंडळावर प्रतिनिधित्व असावयास पाहिजे अशी प्राणी कल्याणात सक्रीय असलेली तीन संघांपैकी प्रत्येकाचे प्रतिनिधित्व करणारी, उक्त संघापैकी प्रत्येक संघाने विहित केलेल्या रीतीने निवड करावयाची एक व्यक्ती ;

(छ) केंद्र सरकारच्या मते मंडळावर प्रतिनिधित्व असावयास पाहिजे अशी, प्राण्यांना क्रूरतेने वागवण्यास प्रतिबंध करण्याशी संबंधित अशा तीन सोसायट्यांपैकी प्रत्येकाचे प्रतिनिधित्व करणारी विहित रीतीने निवडावयाची एक व्यक्ती ;

(ज) केंद्र सरकारने नामनिर्देशित करावयाच्या तीन व्यक्ती ;

(झ) लोकसभेने निवडून द्यावयाचे चार आणि राज्यसभेने निवडून द्यावयाचे दोन असे संसदेचे सहा सदस्य ;

(२) पोटकलम १ च्या खंड (क) किंवा [5][खंड (ख) किंवा खंड (खक) किंवा खंड (खख)] मध्ये निर्देशित केलेल्या कोणत्याही व्यक्ती, कोणत्याही अन्य व्यक्तीला मंडळाच्या कोणत्याही बैठकीने उपस्थित राहण्यासाठी प्रतिनियुक्त करू शकतील.

[6][(३) केंद्र सरकार, मंडळाच्या एका सदस्याला अध्यक्ष म्हणून आणि मंडळाच्या दुसऱ्या एखाद्या सदस्याला उपाध्यक्ष म्हणून नामनिर्देशित करील.]

---

१. १९८२ चा अधिनियम २६, कलम ३ द्वारे "प्राणी कल्याण मंडळ" या शब्दांऐवजी घातले (३० जुलै, १९८२ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम ४ द्वारे "प्राणी कल्याण मंडळ" या शब्दांऐवजी घातले (३० जुलै, १९८२ रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या कलम ५ (क) (एक) द्वारे घातले (३० जुलै, १९८२ रोजी व तेव्हापासून).

४. वरील अधिनियमाच्या कलम ५ (क) (दोन) द्वारे मूळ खंडाऐवजी घातले (३० जुलै, १९८२ रोजी व तेव्हापासून).

५. वरील अधिनियमाच्या कलम ५ (ख) द्वारे "खंड (ख)" या मजकुराऐवजी हा मजकूर समाविष्ट केला (३० जुलै, १९८२ रोजी व तेव्हापासून).

६. वरील अधिनियमाच्या कलम ५ (ग) द्वारे मूळ खंडाऐवजी हा खंड समाविष्ट केला (३० जुलै, १९८२ रोजी व तेव्हापासून).

[१][५क. (१) केंद्र सरकार शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे प्राण्यांना क्रूरतेने वागविण्यास प्रतिबंध करण्याबाबत (विशोधन) अधिनियम, १९८२, अंमलात आल्यानंतर लवकरात लवकर ज्या तारखेस मंडळाची पुनर्घटना करील, त्याच तारखेपर्यंत मंडळाचा अध्यक्ष आणि इतर सदस्य पद धारण करतील व त्याच तारखेस त्यांचा पदावधी समाप्त होईल. मंडळाची पुनर्घटना.

(२) पोटकलम (१) अन्वये पुनर्घटीत करण्यात आलेले मंडळ पोटकलम (१) अन्वये त्याच्या पुनर्घटनेच्या दिनांकापासून दर तिसऱ्या वर्षाच्या समाप्तीला वेळोवेळी पुनर्घटित करण्यात येईल.

(३) पोटकलम (१) अन्वये पुनर्घटित केलेल्या मंडळाच्या सदस्यांमध्ये, अशी पुनर्घटना ज्या तारखेस अंमलात यावयाची असेल त्या तारखेच्या लगतपूर्वी, ज्या व्यक्ती मंडळाच्या सदस्य असतील त्या सर्व व्यक्तींचा समावेश असेल, पण अशा रीतीने पुनर्घटना करण्यात आली नसती तर जेवढया कालावधी-साठी त्यांनी पद धारण केले असते त्या कालावधीच्या न संपलेल्या कालावधीसाठीच फक्त पद धारण करतील आणि त्या व्यक्ती, मंडळाचे सदस्य असण्याचे बंद झाल्यामुळे निर्माण होणारी रिक्त पदे ही, अशा रीतीने पुनर्घटित केलेल्या मंडळाच्या मुदतीच्या उर्वरित कालावधीसाठी नैमित्तिक रिकामी पदे म्हणून भरण्यात येतील :

परंतु, या पोटकलमातील कोणतीही गोष्ट, प्राण्यांना क्रूरतेने वागविण्यास प्रतिबंध करण्याबाबत (विशोधन) अधिनियम, १९८२ याच्या कलम ५ खंड (क) उपखंड (दोन) द्वारे कलम ५ च्या पोट-कलम (१) मध्ये केलेल्या विशोधनाच्या आधारे, जी मंडळाचा सदस्य असण्याचे बंद झाली असेल त्या व्यक्तीच्या संबंधात लागू होणार नाही].

[२][६. (१) कलम ५क अन्वये ज्या कालावधीसाठी मंडळ पुनर्घटित होऊ शकेल, तो कालावधी मंडळाच्या सदस्यांचा पुनर्घटनेच्या दिनांकापासून तीन वर्षे असेल आणि अशा प्रकारे पुनर्घटित करण्यात आलेल्या मंडळाचा अध्यक्ष किंवा अन्य सदस्य ज्या कालावधीसाठी मंडळ पुनर्घटित करण्यात आले असेल तो कालावधी समाप्त होईपर्यंत पद धारण करील. मंडळाच्या सदस्यांचा पदावधी आणि त्यांच्या सेवाशर्ती.

(२) पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी,—

(क) पदसिद्ध सदस्याचा पदावधी, तो ज्याच्या आधारे असा सदस्य झाला असेल त्या आधारे तो पद धारण करण्याचे चालू ठेवील ;

(ख) व्यक्तींच्या निकायाचे प्रतिनिधित्व करण्यासाठी कलम ५ च्या खंड (ग), खंड (ङ) खंड (च), खंड (छ), खंड (ज) किंवा खंड (झ) अन्वये निवडून दिलेल्या किंवा निवडलेल्या सदस्यांचा पदावधी, ज्यांनी त्याला निवडून दिले किंवा ज्यांच्या बाबतीत तो, निवडला गेला होता, त्या निकायाचे सदस्य असण्याचे बंद झाल्यानंतर लगेचच समाप्त होईल ;

(ग) नैमित्तिक रिकामे पद भरण्यासाठी नियुक्त केलेल्या, नामनिर्देशित केलेल्या, निवडून दिलेल्या किंवा निवडलेल्या सदस्यांचा पदावधी ज्यांच्या जागी तो नियुक्त झाला आहे, नाम-निर्देशित झाला आहे, निवडून दिला आहे किंवा निवडला आहे त्या सदस्याच्या पदाच्या उरलेल्या कालावधीपर्यंत चालू राहील ;

(घ) केंद्र सरकार कोणत्याही वेळी, कारणे लेखी नमूद करून त्या कारणास्तव, त्याला काढून टाकण्याच्या प्रस्तावा विरुद्धचा कारणे दाखवण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, त्याला काढून टाकू शकेल आणि अशा काढून टाकल्यामुळे रिक्त झालेले कोणतेही पद खंड (ग) च्या प्रयोजनार्थ नैमित्तिकरीत्या रिक्त झालेले पद असल्याचे समजण्यात येईल.

(३) मंडळाच्या सदस्यांना, मंडळाने केंद्र सरकारच्या पूर्वमान्यतेच्या अधीनतेने यासंबंधात केलेल्या विनियमांद्वारे उपबंधित करता येतील अशा सवलती मिळतील.

(४) मंडळातील कोणतेही पद रिक्त असण्याच्या किंवा मंडळाच्या घटनेत दोष असण्याच्या केवळ कारणावरून केलेली कोणतीही कृती किंवा कार्यवाही प्रश्नास्पद ठरणार नाही आणि विशेषतः आणि पूर्वगामी गोष्टीच्या व्यापकतेला बाध न येता कलम ५क अन्वये मंडळ ज्या कालावधीसाठी पुनर्घटित करण्यात आले असेल त्या कालावधीची समाप्ती व त्या कलमाखाली ज्याची ज्या कालावधीसाठी पुन-र्घटना करण्यात आली असेल तो कालावधी या दोहोंमधील अवधीत मंडळाचे पदसिद्ध सदस्य मंडळाच्या सर्व शक्तींचा वापर करील व कामे पार पाडील.]

७. (१) केंद्र सरकार [३][ * * * ] मंडळाच्या सचिवाची नियुक्ती करील. मंडळाचा सचिव आणि अन्य कर्मचारी.

(२) यासंबंधात केंद्र सरकारकडून करण्यात येतील अशा नियमांच्या अधीनतेने मंडळ, आपल्या शक्तींचा वापर करण्यासाठी आणि कार्ये पार पाडण्यासाठी आवश्यक इतके अधिकारी व कर्मचारी यांची नियुक्ती करू शकेल किंवा केंद्र सरकारच्या पूर्वमान्यतेने केलेल्या विनियमांद्वारे अशा अधिकाऱ्यांच्या आणि कर्मचाऱ्यांच्या सेवेच्या अटी व शर्ती ठरवू शकेल.

---

१. १९८२ चा अधिनियम २६, कलम ६ द्वारे घातले (३० जुलै, १९८२ रोजी व तेव्हापासून).
२. वरील अधिनियमाच्या कलम ७ द्वारे मूळ कलमाऐवजी घातले (३० जुलै, १९८२ रोजी व तेव्हापासून).
३. वरील अधिनियमाच्या कलम ८ द्वारे वगळले (३० जुलै, १९८२ रोजी व तेव्हापासून).

मंडळाचा निधी. ८. मंडळाच्या निधीमध्ये शासनाने वेळोवेळी दिलेली अनुदाने आणि कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाने किंवा कोणत्याही अन्य व्यक्तीने दिलेले अंशदान, देणग्या, अभिदाने, मृत्यूपत्रित देणग्या, दान आणि तत्सम गोष्टी यांचा समावेश होईल.

मंडळाची कार्ये. ९. मंडळाची कार्ये पुढीलप्रमाणे असतील :—

(क) सतत अभ्यास करून प्राण्यांना क्रूरतेने वागवण्यास प्रतिबंध करण्यासाठी भारतात कायद्याचा अंमल चालू ठेवणे आणि अशा कोणत्याही कायद्यात विशोधने करण्यासाठी शासनाला वेळोवेळी सल्ला देणे ;

(ख) प्राण्यांना उगाच होणाऱ्या यातना किंवा वेदना यांना प्रतिबंध करण्याच्या दृष्टीने सर्व सामान्यत: आणि विशेष करून प्राण्यांचे एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी परिवहन करण्यात येत असेल तेव्हा किंवा खेळ करणारे प्राणी म्हणून त्यांचा उपयोग केला जात असेल तेव्हा किंवा ते बंदिस्त किंवा परिरूद्ध असतील तेव्हा त्यांना उगाचच होणाऱ्या यातना किंवा वेदना यांना प्रतिबंध करण्याच्या दृष्टीने या अधिनियमाखाली नियम करण्याबाबत केंद्र सरकारला सल्ला देणे ;

(ग) भारवाही प्राण्यांचे (डॉट ॲनिमल) कष्ट कमी व्हावे यासाठी वाहनांच्या संकल्पचित्रात सुधारणा करण्याच्या बाबतीत, शासनाला किंवा कोणत्याही स्थानिक, प्राधिकरणाला किंवा इतर व्यक्तीला सल्ला देणे ;

(घ) गोठे, पाण्याच्या द्रोणी आणि तत्सम गोष्टी बांधण्यास उत्तेजन देऊन किंवा बांधण्याची तरतूद करून आणि प्राण्यांना वैद्यकीय मदत देण्याची तरतूद करून [1][प्राण्यांची स्थिती सुधारण्यासाठी] मंडळाला योग्य वाटतील अशा सर्व उपाययोजना करणे.

(ङ) कत्तलीपूर्वीच्या काळात प्राण्यांना उगाचच होणाऱ्या यातना किंवा वेदना मग त्या शारीरिक असोत किंवा मानसिक असोत कमी केल्या जातील, अशा प्रकारे कत्तलखान्यांचे संकल्पचित्र तयार करण्याबाबत किंवा त्यांचे परिरक्षण करण्याबाबत आणि आवश्यक असेल तेव्हा, शक्य तेथवर दयाबुद्धी ठेवून प्राण्यांना ठार करण्याबाबत शासनाला किंवा कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाला किंवा अन्य व्यक्तीला सल्ला देणे ;

(च) नको असणारे प्राणी एकतर तत्क्षणी किंवा यातना किंवा वेदना यांच्याबाबतीत तो प्राणी संवेदनाशून्य झाल्यावर, स्थानिक प्राधिकरणाने त्याला मारून टाकणे आवश्यक आहे याबद्दल स्वत:ची खात्री करून घेण्यासाठी मंडळास योग्य वाटतील अशा सर्व उपाययोजना करणे ;

(छ) प्राणी किंवा पक्षी म्हातारे व निरुपयोगी झाले असतील आणि त्यांना संरक्षणाची गरज असताना त्या प्राण्यांना किंवा पक्षांना जेथे आश्रय मिळेल असे [2][पांजरपोळ, सुरक्षागृहे, प्राण्यांसाठी आश्रयस्थाने, अभयस्थाने आणि तत्सम ठिकाणे तयार करण्यासाठी किंवा स्थापण करण्यासाठी] वित्तीय सहाय्य देऊन किंवा अन्य प्रकारे उत्तेजन देणे ;

(ज) प्राण्यांना उगाचच यातना किंवा वेदना देण्यास प्रतिबंध करण्याच्या किंवा प्राणी आणि पक्षी यांचे संरक्षण करण्याच्या प्रयोजनार्थ स्थापन करण्यात आलेल्या संघांना किंवा संस्थांना सहकार्य करण आणि त्यांच्या कामात समन्वय साधणे ;

(झ) कोणत्याही स्थानिक क्षेत्रात काम करणाऱ्या प्राणी कल्याण संघटनांना वित्तीय आणि इतर सहाय्य देणे किंवा मंडळाच्या सर्वसाधारण पर्यवेक्षणासाठी आणि मार्गदर्शनासाठी ज्या काम करतात अशा कोणत्याही स्थानिक क्षेत्रात प्राणी कल्याणकारी संघटना तयार करण्यास उत्तेजन देणे ;

(ञ) प्राणी रुग्णालयात तरतूद करण्यात येईल अशी वैद्यकीय परिचर्या व प्राण्यांची वैद्यकीयदृष्ट्या काळजी घेणे व या बाबींच्या संबंधात आणि मंडळाला तसे करणे आवश्यक वाटेल तेव्हा प्राणी रुग्णालयाला वित्तीय आणि इतर सहाय्य पुरवण्यासाठी शासनाला सल्ला देणे ;

(ट) प्राण्यांना भूतदयेने वागवण्यासंबंधी शिक्षण देणे आणि प्राण्यांना उगाचच वेदना व यातना देण्याविरुद्ध जनमत तयार करण्यासाठी आणि व्याख्याने, पुस्तके, भित्तीपत्रके, चलचित्रपट, प्रदर्शने आणि तत्सम साधनांनी प्राण्यांच्या कल्याणाला प्रोत्साहन देण्यासाठी उत्तेजन देणे ;

(ठ) प्राणी कल्याणाशी संबंधित किंवा प्राण्यांना उगाचच दिल्या जाणाऱ्या वेदना व यातना यांना प्रतिबंध करण्याशी संबंधित कोणत्याही बाबींवर शासनाला सल्ला देणे.

विनियम करण्याची मंडळाची शक्ती. १०. मंडळ, केंद्र सरकारच्या पूर्वमान्यतेच्या अधीनतेने, त्याच्या कामकाजाच्या प्रशासनासाठी आणि त्याची कार्ये पार पाडण्यासाठी त्यास योग्य वाटतील असे विनियम करू शकेल.

---

१. १९८२ चा अधिनियम २६, कलम ९(क) द्वारे मूळ मजकुराऐवजी समाविष्ट केले (३० जुलै, १९८२ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या, कलम ९(ख) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर घातला (३० जुलै, १९८२ रोजी व तेव्हापासून).

## प्रकरण तीन

### प्राण्यांना क्रूरतेने वागविणे

**प्राण्यांना क्रूरतेने वागवणे.**

११. (१) कोणतीही व्यक्ती,

(क्) कोणत्याही प्राण्याला मारील, लाथेने मारील, त्याच्यावर अधिक भार लादेल, त्याला अधिक दामटेल, त्याच्यावर क्षमतेपेक्षा जास्त वजन ठेवील, त्याचा छळ करील किंवा त्या प्राण्याला उगीचच वेदना व यातना होतील अशा प्रकारे वागवील तर; किंवा

(ख्) [1][ज्याचे वय झाल्यामुळे किंवा कोणत्याही रोगामुळे] विकलतेमुळे, जखमी झाल्यामुळे दुखापत झाल्यामुळे किंवा इतर कोणत्याही कारणामुळे असे काम करण्यास जो प्राणी अयोग्य, ठरला असेल अशा [2][कोणत्याही प्राण्याकडून कोणतेही काम, मेहनत किंवा अन्य कोणत्याही गोष्टी करून घेईल] किंवा मालक म्हणून अशा प्राण्याला कामाला लावण्याची परवानगी देईल तर; किंवा

(ग्) [3][कोणत्याही प्राण्याला] बुद्धिपुरस्सर आणि गैरवाजवीपणे कोणतेही क्षतिकारक औषधिद्रव्य किंवा क्षतिकारक पदार्थ देईल किंवा [3][कोणत्याही प्राण्याला] बुद्धिपुरस्सर आणि गैरवाजवीपणे किंवा असे कोणतेही औषधिद्रव्य किंवा पदार्थ (पोटात) घ्यायला लावील किंवा घ्यायला लावण्याचा प्रयत्न करील; किंवा

(घ्) कोणत्याही प्राण्याला ज्यामुळे त्याला उगाचच वेदना किंवा यातना होतील अशा रीतीने किंवा अशा स्थितीत मग त्याला कोणत्याही वाहनातून किंवा वाहनावर घालून आणलेले असो वा नसो वाहून आणील किंवा नेईल; किंवा

(ङ्) कोणत्याही प्राण्याला ज्यात प्राण्याला त्याच्या उंचीच्या, रुंदीच्या आणि जाडीच्या मानाने पुरेसे नसल्यामुळे वाजवी रीत्या हालचाल करता येणार नाही अशा कोणत्याही पिंजऱ्यात किंवा पात्रात ठेवील किंवा परिरुद्ध करील; किंवा

(च्) कोणत्याही पशूला गैरवाजवीपणे आखूड किंवा गैरवाजवीपणे जड असलेल्या साखळीने किंवा दोराने, गैरवाजवी कालावधीसाठी बांधून ठेवील; किंवा

(छ्) मालक म्हणून, कोणत्याही कुत्र्याला नेहमी साखळीने बांधून ठेवून किंवा बंदिवासात ठेवण्याची व्यवस्था करून त्याच्याकडून वाजवीरीत्या कसरती करून घेण्याकडे किंवा त्याची कसरत करण्याची व्यवस्था करण्याकडे, ती दुर्लक्ष करील; किंवा

(ज्) [3][कोणत्याही प्राण्याचा] मालक म्हणून त्या प्राण्याला पुरेसे अन्न, पाणी किंवा निवारा देण्यास ती चुकेल; किंवा

(झ्) कोणत्याही प्राण्याची वाजवी कारणाशिवाय उपासमारी किंवा तहानेने व्याकुळ होण्याची शक्यता असेल अशा परिस्थितीत तसेच सोडून देईल; किंवा

(ञ्) ज्याचा ती मालक आहे अशा कोणत्याही प्राण्याला तो प्राणी सांसर्गिक किंवा संक्रामक आजाराने पिडीत असताना कोणत्याही हमरस्त्यावर कोठही बुद्धिपुरस्सर जाऊ देईल किंवा ज्या अशा कोणत्याही रोगी किंवा विकलांग प्राण्याचा ती मालक आहे, त्याला वाजवी कारणाशिवाय, कोणत्याही रस्त्यावर मरण्यासाठी सोडून देईल; किंवा

(ट्) ज्याचा अवयव छाटल्यामुळे, भूक, तहान अतिगर्दी, किंवा इतर दुर्व्यवहार यामुळे किंवा इतर प्रकारे जाच केल्यामुळे तो वेदनेने पिडीत झाला आहे, असा तिच्या ताब्यात असणारा कोणताही प्राणी विकेल किंवा वाजवी कारणाशिवाय तो विकण्यासाठी काढेल; किंवा

[4][(ठ्) कोणत्याही प्राण्याची (यात बेवारशी कुत्री अंतर्भूत असतील) त्याच्या हृदयात, स्ट्रायचीन इंजेक्शन टोचण्याच्या पद्धतीने किंवा उगीचच इतर कोणतीही निर्दयतेची पद्धत वापरून अवयव छाटील किंवा कोणत्याही प्राण्याला मारून टाकील, किंवा]

---

१. १९८२ चा अधिनियम २६, कलम १० (क्) (एक) द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले (३० जुलै, १९८२ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम १० (क्) (दोन) द्वारे मूळ मजकुराऐवजी घातले (३० जुलै, १९८२ रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या कलम १० (क्) (तीन) द्वारे मूळ शब्दांऐवजी घातले (३० जुलै, १९८२ रोजी व तेव्हापासून).

४. वरील अधिनियमाच्या कलम १० (क्) (चार) द्वारे मूळ खंडाऐवजी घातले (३० जुलै, १९८२ रोजी व तेव्हापासून).

[1][(इ) केवळ करमणुकीकरिता,—

(एक) कोणत्याही प्राण्याला जेणे करून तो अन्य कोणत्याही प्राण्याचे भक्ष्य बनेल, (यात अभयारण्यात वाघाचे किंवा अन्य प्राण्याचे भक्ष म्हणून बांधलेल्या पशूचा अंतर्भाव असेल) अशा प्रकारे परिरुद्ध करून ठेवील किंवा परिरुद्ध करवील; किंवा

(दोन) कोणत्याही प्राण्याला अन्य कोणत्याही प्राण्याशी झुंज देण्याकरिता किंवा त्याला लालूच दाखविण्याकरिता चिथावणी देईल; किंवा]

(ड) [2][ * * * * *] प्राण्यांची झुंज लावण्यासाठी किंवा कोणत्याही प्राण्याला लालूच दाखवण्यासाठी कोणत्याही जागेची योजना करील, तिचा उपयोग करील किंवा तिची व्यवस्था ठेवण्याची कृती करील किंवा कोणत्याही जागेचा अशा उपयोग करण्यासाठी परवानगी देईल किंवा ती तशा उपयोगासाठी देऊ करील किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीला अशा कोणत्याही प्रयोजनासाठी कोणतीही जागा ठेवण्यास किंवा तिचा उपयोग करण्यास परवानगी देऊन पैसे मिळविल; किंवा

(ण) ज्या नेमबाजीच्या सामन्यामध्ये किंवा स्पर्धेत ज्यात असा नेम धरण्यासाठी प्राण्यांना बंदिवासातून मुक्त करण्यात येत असेल, त्यासामन्यांना किंवा स्पर्धांना प्रोत्साहन देईल, किंवा त्यात भाग घेईल,

तर ती, [3][पहिल्या अपराधाच्याबाबतीत, दहा रुपयांहून कमी नसणाऱ्या, परंतु पन्नास रुपयांपर्यंत असू शकणाऱ्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस आणि पूर्वीचा अपराध घडल्यापासून तीन वर्षांच्या आत करण्यात आलेल्या दुसऱ्या किंवा तद्नंतर केलेल्या अपराधाच्या बाबतीत पंचवीस रुपयांहून कमी नसणाऱ्या, परंतु शंभर रुपयांपर्यंत असू शकेल एवढया द्रव्यदंडाच्या शिक्षेस किंवा तीन महिन्यापर्यंत असू शकेल एवढया कारावासाच्या शिक्षेस किंवा दोन्ही शिक्षांस पात्र असेल.]

(२) पोट कलम (१) च्या प्रयोजनार्थ, एखादा मालक, अशा अपराधाला प्रतिबंध करण्याच्या दृष्टीने वाजवी काळजी घेण्यास आणि त्याच्यावर देखरेख करण्यास चुकेल तर, त्याने अपराध केला असल्याचे मानण्यात येईल :

परंतु, अशी काळजी घेण्यास किंवा देखरेख ठेवण्यास चुकल्याच्या केवळ कारणावरून त्याने क्रूरता दाखवण्यास परवानगी दिल्याबद्दल मालक सिद्धदोषी ठरला असेल त्याबाबतीत, त्याला द्रव्यदंडाचा विकल्प दिल्याखेरीज, कारावासाच्या शिक्षेस तो पात्र ठरणार नाही.

(३) या कलमातील कोणताही मजकूर—

(क) विहित करण्यात आलेल्या रीतीने गुरांची शिंगे उपटणे किंवा कोणत्याही प्राण्याचे खच्चीकरण करणे किंवा डाग देणे किंवा त्याच्या नाकात वेसण घालणे; किंवा

(ख) बेवारशी कुत्र्याला प्राणहारक कक्षात कोंडून किंवा [4][विहित करण्यात येईल अशा इतर पद्धतीने] त्यांचा नाश करणे; किंवा

(ग) त्या त्या काळी अमलात असलेल्या कोणत्याही कायद्याच्या प्राधिकारा अन्वये, कोणत्याही प्राण्याचा निर्वंश करणे किंवा त्याचा नाश करणे; किंवा

(घ) चौथ्या प्रकरणामधील कोणतीही बाब हाताळणे; किंवा

(ङ) मानवजातीचे अन्न म्हणून कोणत्याही प्राण्याचा नाश करताना किंवा नाश करण्याची तयारी करताना प्राण्याला उगीचच यातना किंवा वेदना न देता असा नाश करणे किंवा तो करण्याचा प्रयत्न करणे,

या गोष्टींना लागू असणार नाही.

फुका किंवा डूमदेव करण्याबद्दल शिक्षा.

१२. कोणतीही व्यक्ती, कोणत्याही गायीवर किंवा अन्य दुसऱ्या प्राण्यावर, [4][त्याच्या दुग्धस्त्रवणात वाढ होण्यासाठी प्राण्यांच्या आरोग्याला घातक असणारी,] फुका किंवा [5][डूमदेव] या नावाने संबोधली जाणारी प्रक्रिया किंवा अन्य कोणतीही प्रक्रिया करील, [4][(त्यात कोणत्याही पदार्थाच्या इंजेक्शनचा अंतर्भाव असेल)] किंवा तिच्या ताब्यात असणाऱ्या किंवा नियंत्रणाखाली असणाऱ्या अशा कोणत्याही प्राण्यावर अशी प्रक्रिया करण्यास परवानगी देईल तर तो एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल अशा द्रव्यदंडाच्या शिक्षेस किंवा दोन वर्षांपर्यंत असू शकेल अशा कारावासाच्या शिक्षेस किंवा दोन्ही शिक्षांस पात्र असेल आणि ज्या प्राण्यावर अशी प्रक्रिया झाली होती तो प्राणी शासनाकडे समपहृत करण्यात येईल.

---

१. १९८२ चा अधिनियम २६. कलम १० (क) (पाच) द्वारे मूळ खंडाऐवजी घातले. (३० जुलै, १९८२ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम १० (क) (सहा) याद्वारे हा मजकूर वगळण्यात आला (३० जुलै, १९८२ रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या कलम १० (क) (सात) द्वारे मूळ मजकुराऐवजी समाविष्ट केले (३० जुलै, १९८२ रोजी व तेव्हापासून).

४. वरील अधिनियमाच्या कलम १० (ख) याद्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकुर समाविष्ट केला. (३० जुलै, १९८२ रोजी व तेव्हापासून).

५. वरील अधिनियमाच्या कलम ११ द्वारे "डूमदेव" या शब्दाऐवजी हा मजकूर समाविष्ट केला (३० जुलै, १९८२ रोजी व तेव्हापासून).

१३. (१) एखाद्या प्राण्याचा मालक कलम ११ खालील अपराधाबद्दल सिद्धदोषी असेल त्या बाबतीत, प्राण्याला जिवंत ठेवणे क्रूरतेचे ठरणार असल्याबद्दल न्यायालयाची खात्री पटली असेल तर, त्याने प्राण्याचा नाश करण्याचा निदेश देणे आणि प्राण्याला तसे करण्यास योग्य असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीकडे सोपविणे आणि ज्या व्यक्तीकडे असा प्राणी त्या प्रयोजनार्थ सोपविण्यात आला आहे, तिने अशा प्राण्यांचा नाश करणे किंवा त्याला उगीचच यातना न देता अशा; प्राण्यांचा स्वतःच्या उपस्थितीत नाश करणे, कायदेशीर असेल आणि प्राण्यांचा नाश करण्यासाठी करण्यात आलेला कोणताही वाजवी खर्च मालकाकडून द्रव्यदंड म्हणून वसूल करण्याबाबत न्यायालयाकडून निदेश देण्यात येईल : यातना होत असलेल्या प्राण्याचा नाश करणे.

परंतु मालक याच्याशी सहमत नसेल तर, त्या क्षेत्राच्या प्रभारी पशुवैद्यक अधिकाऱ्याने पुरावा दिल्याशिवाय या कलमाखालील कोणताही आदेश देता येणार नाही.

(२) कोणत्याही दंडाधिकाऱ्यास, पोलीस आयुक्तास किंवा जिल्हा पोलीस आयुक्तास असे समजण्यास कारण असेल की, कलम ११ अन्वये करण्यात आलेला एखादा अपराध कोणत्याही प्राण्याच्या संबंधातील आहे तर तो, त्याच्या मते प्राण्याला जिवंत ठेवणे क्रूरतेचे ठरणार असेल तर तशा प्राण्याचा ताबडतोब नाश करण्याबाबत आदेश देऊ शकेल.

(३) ज्याला अशा प्रकाराचा रोग किंवा अशा प्रकारची जबर इजा झालेली आहे किंवा त्याच्या मते क्रूरता दाखविल्याशिवाय दूर करता येणार नाही, अशा शारीरिक अवस्थेतील कोणताही प्राणी आढळेल, तो पोलीस शिपायाच्या वरच्या दर्जाचा कोणताही पोलीस अधिकारी किंवा याबाबतीत शासनाकडून प्राधिकृत करण्यात आलेली कोणतीही व्यक्ती, त्या प्राण्याचा मालक अनुपस्थित असेल किंवा त्याने प्राण्याला नष्ट करण्यास सहमती देण्याचे नाकारले असेल तर, जेथे असा प्राणी आढळेल त्या क्षेत्राच्या प्रभारी पशुवैद्यक अधिकाऱ्याला तात्काळ बोलावू शकेल, आणि प्राण्याला जिवंत ठेवणे क्रूरतेचे ठरेल अशी प्राणघातक इजा त्याला झालेली आहे किंवा अशाप्रकारे जबर इजा झाली आहे किंवा अशा प्रकारच्या शारीरिक अवस्थेत तो प्राणी आहे, असे पशुवैद्यक अधिकाऱ्याने प्रमाणित केले तर, पोलीस अधिकारी, किंवा यथास्थिति, प्राधिकृत करण्यात आलेली व्यक्ती, दंडाधिकाऱ्याचा आदेश मिळाल्यानंतर इजा झालेल्या किंवा इजा झाल्यामुळे नाश करावयाच्या प्राण्याचा [1][विहित करण्यात येईल अशा रीतीने] नाश करू शकेल.

(४) प्राण्याचा नाश करण्यासाठी दंडाधिकाऱ्यांनी दिलेल्या कोणत्याही आदेशाविरुद्ध अपील करता येणार नाही.

## प्रकरण चार

### प्राण्यांवर प्रयोग करणे

१४. या अधिनियमामध्ये अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे, जीव वाचविण्यासाठी किंवा त्याचे आयुष्य वाढवण्यासाठी किंवा त्याच्या यातना कमी करण्यासाठी किंवा कोणत्याही रोगाचा—मग तो मानवजातीचा, प्राण्यांचा किंवा वनस्पतींचा असो— प्रतिकार करण्यासाठी उपयुक्त ठरणारे शरीरक्रियात्मक ज्ञान, नवीन शोधाद्वारे प्रगत करण्यासाठी प्राण्यांवर प्रयोग करणे (यात शस्त्रक्रिया करून करण्यात येणारे प्रयोगही अंतर्भूत आहेत) बेकायदेशीर ठरणार नाही. प्राण्यांवर प्रयोग करणे.

१५. (१) मंडळाच्या सल्ल्यावरून कोणत्याही वेळी प्राण्यांवरील प्रयोग करण्यांवर नियंत्रण व देखरेख ठेवण्यासाठी तसे करणे आवश्यक आहे असे केंद्र सरकारचे मत असेल तर, ते **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे त्याला नियुक्त करणे योग्य वाटेल तितक्या शासकीय आणि अशासकीय व्यक्तींचा समावेश असणारी एक समिती घटित करू शकेल. प्राण्यांवरील प्रयोग करण्यावर नियंत्रण आणि देखरेख ठेवण्याकरिता समिती.

(२) केंद्र सरकार, समितीच्या सदस्यांपैकी एका व्यक्तीला "अध्यक्ष" म्हणून नामनिर्देशित करील.

(३) समितीला तिचे कर्तव्य बजावण्यासंबंधीच्या तिच्या स्वतःच्या कार्यपद्धतीचे विनियमन करण्याची शक्ती असेल.

(४) समितीच्या निधींमध्ये शासनाकडून वेळोवेळी देण्यात येणाऱ्या अनुदानाचा आणि कोणत्याही व्यक्तीकडून दिले जाणारे अंशदान, देणग्या, अभिदान, मृत्यूपत्रित देणग्या, दान आणि तत्सम गोष्टी यांचा समावेश असेल.

[2][**१५क.** (१) समिती, आपल्या कोणत्याही शक्तींचा वापर करण्यासाठी किंवा तिच्या कोणत्याही कर्तव्यांचे पालन करण्यासाठी किंवा समितीकडे विचारार्थ सोपविण्यात येईल त्या कोणत्याही प्रकरणाची चौकशी करण्यासाठी किंवा अहवाल तयार करण्यासाठी आणि सल्ला देण्यासाठी तिला योग्य वाटतील तितक्या उपसमित्या घटित करू शकेल. उपसमित्या.

(२) उप समितीमध्ये केवळ समितीच्या सदस्यांचाच समावेश असेल.]

१. १९८२ चा अधिनियम २६, कलम १२ द्वारे घातले (३० जुलै, १९८२ रोजी व तेव्हापासून).
२. वरील अधिनियमाच्या कलम १३ द्वारे घातले (३० जुलै, १९८२ रोजी व तेव्हापासून).

समितीचा कर्मचारी- १६. समिती केंद्र सरकारच्या नियंत्रणाच्या अधीनतेने, तिला आपल्या शक्तींचा वापर करणे वर्ग आणि कर्तव्यांचे पालन करणे शक्य व्हावे यासाठी आवश्यक असतील तितके अधिकारी आणि अन्य कर्मचारी यांची नियुक्ती करू शकेल आणि अशा अधिकाऱ्यांचे आणि कर्मचाऱ्यांचे पारिश्रमिक आणि अन्य अटी व सेवा शर्ती निर्धारित करू शकेल.

समितीची कर्तव्य आणि प्राण्यांवर वेदना किंवा यातना देऊन प्रयोग करण्यासंबंधी नियम करण्याची समितीची शक्ती. १७. (१) प्राण्यांवर प्रयोग करण्यापूर्वी, ते करीत असताना किंवा केल्यानंतर त्यांना उगीचच वेदना किंवा यातना देऊन ते करण्यात आलेले नाहीत याची खातरजमा करून घेण्यासाठी आवश्यक असतील अशा सर्व उपाययोजना करणे हे, समितीचे कर्तव्य असेल, आणि त्या प्रयोजनार्थ, ती **भारताच्या राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे आणि पूर्व प्रकाशनाच्या अधीनतेने असे प्रयोग करण्यासंबंधात तिला योग्य वाटतील असे नियम करू शकेल.

[1][(१क) विशेषत: आणि पूर्वगामी शक्तींच्या व्यापकतेस बाध न येता, खालील बाबींकरिता असे नियम करण्यात येतील त्या अशा :—

(क) प्राण्यांवर प्रयोग करणाऱ्या व्यक्ती किंवा संस्था यांची नोंदणी करणे ;

(ख) प्राण्यांवर प्रयोग करणाऱ्या व्यक्तींनी किंवा संस्थांनी अहवाल व इतर माहिती समितीकडे अग्रेषित करणे.]

(२) विशेषत: आणि पूर्वगामी शक्तींच्या व्यापकतेला बाध न येता, समितीकडून केल्या जाणाऱ्या नियमांची रचना, खालील उद्दिष्टे साध्य होतील हे निश्चित करण्याच्या दृष्टीने करण्यात येईल:—

(क) कोणत्याही संस्थेमध्ये जेव्हा प्रयोग केले जात असतील तेव्हा त्यांची जबाबदारी त्या संस्थेच्या प्रभारी व्यक्तीवर टाकण्यात येईल आणि कोणत्याही संस्थेच्या बाहेर जेव्हा व्यक्तीकडून प्रयोग केले जात असतील तेव्हा त्या व्यक्ती, त्या संबंधात अर्हताप्राप्त असतील आणि त्यांच्यावर केल्या जाणाऱ्या प्रत्येक प्रयोगाची संपूर्ण जबाबदारी त्या व्यक्तीवर राहील ;

(ख) यथोचित काळजी घेऊन आणि भूतदयेने प्रयोग करण्यात येतील आणि शक्य असेल तेथवर शस्त्रक्रियांचा अंतर्भाव असणारे प्रयोग, प्राण्यांना होणाऱ्या वेदनांना प्रतिबंध करण्याचे पुरेसे सामर्थ्य असलेल्या काही बधिरकांच्या प्रभावाखाली करण्यात येतील ;

(ग) बधिरकांच्या प्रभावाखाली प्रयोग करताना, ज्या प्राण्यांना अशा प्रकारची इजा झालेली असेल की त्यातून बरे होताना त्यांना गंभीर यातना होणार असतील, अशा प्राण्यांचा ते संवेदनाशून्य अवस्थेत असेतोपर्यंत सामान्यपणे नाश केला जाईल ;

(घ) प्राण्यांवर प्रयोग करणे जेव्हा जेव्हा टाळणे शक्य असेल तेव्हा तसे केले जाईल ; उदाहरणार्थ, वैद्यकीय विद्यालये, रुग्णालये, महाविद्यालये यांमध्ये आणि तत्सम ठिकाणी पुस्तके, प्रतिमाने (मॉडेल्स), फिल्म्स आणि तत्सम शैक्षणिक साधने तितकीच पुरेशी असतील तेव्हा तसे केले जाईल;

(ङ) मोठ्या प्राण्यावर प्रयोग करून मिळणारे निष्कर्ष हे जेव्हा गिनिपिग, ससे, बेडूक व उंदीर यांसारख्या लहान प्रयोगशालेय प्राण्यांवर प्रयोग केले असता मिळणाऱ्या निष्कर्षासारखेच मिळण्याची शक्यता असेल तर मोठ्या प्राण्यांवर प्रयोग करण्याचे टाळले जाईल;

(च) शक्य असेल तेथवर, हस्तकौशल्य संपादन करण्यासाठी प्रयोग करता येणार नाहीत;

(छ) प्रयोग करण्याच्या उद्देशाने आणलेल्या प्राण्यांची, प्रयोग करण्यापूर्वी किंवा प्रयोग केल्यानंतर अशा दोन्ही वेळी योग्य ती काळजी घेतली जाईल ;

(ज) प्राण्यांवर प्रयोग करण्याच्या बाबतीतील योग्य ते अभिलेख ठेवले जातील.

(३) या कलमाअन्वये कोणताही नियम करताना समितीला (ज्या उद्दिष्टांसाठी समिती स्थापन करण्यात आली असेल, त्या उद्दिष्टांशी सुसंगत) असे जे निदेश केंद्र सरकार देऊ शकेल ते निदेश देऊन मार्गदर्शन करण्यात येईल आणि केंद्र सरकारला याद्वारे असे निदेश देण्याचा प्राधिकार देण्यात आला आहे.

(४) समिती करील ते सर्व नियम संस्थेबाहेर प्रयोग करणाऱ्या व्यक्तींवर आणि ज्या संस्थेत प्रयोग करण्यात येत असतील त्या संस्थेच्या प्रभारी व्यक्तींवर बंधनकारक असतील.

प्रवेश आणि तपासणी करण्याची शक्ती. १८. समिती तिने केलेल्या नियमांचे अनुपालन करण्यात येत आहे हे सुनिश्चित करण्याच्या प्रयोजनार्थ तिच्या कोणत्याही अधिकाऱ्याला किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीला जेथे प्रयोग करण्यात येत असतील अशा कोणत्याही संस्थेचे किंवा जागेचे निरीक्षण करण्यासाठी आणि अशा निरीक्षणाचा निष्कर्ष कळवण्यासाठी लेखी प्राधिकृत करू शकेल आणि अशा रीतीने प्राधिकृत केलेला कोणताही अधिकारी किंवा व्यक्ती,—

(क) तिला योग्य वाटेल अशा कोणत्याही वेळी आणि ज्या कोणत्याही संस्थेमध्ये किंवा जागेत प्राण्यांवर प्रयोग करण्यात येत असतील अशा ठिकाणी प्रवेश करू शकेल आणि तिचे निरीक्षण करू शकेल ; आणि

(ख) तिला आवश्यक वाटेल तर, कोणत्याही व्यक्तीला, त्याच्या जवळ प्राण्यांवरील प्रयोगासंबंधी असणारी कोणतीही नोंद हजर करण्यास फर्मावू शकेल.

१. १९८२ चा अधिनियम २६, कलम, १४ द्वारे घातले (३० जुलै, १९८२ रोजी व तेव्हापासून).

१९. कोणत्याही अधिकाऱ्याने किंवा अन्य व्यक्तीने कलम १८ अन्वये केलेल्या किंवा अन्यथा केलेल्या कोणत्याही निरीक्षणाचे निष्कर्ष कळवल्यावरून समितीची अशी खात्री झाली की, प्राण्यांवर प्रयोग करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीकडून किंवा संस्थेकडून कलम १७ अन्वये केलेल्या नियमांचे अनुपालन केले जात नाही, तर समिती, त्याबाबतीत कोणत्याही व्यक्तीला किंवा संस्थेला आपले म्हणणे मांडण्याची संधी देऊन एकतर विनिर्दिष्ट किंवा अनिश्चित कालावधीकरिता असे कोणतेही प्रयोग करणे चालू ठेवण्यास आदेशाद्वारे मनाई करू शकेल किंवा समितीला त्याच्यावर लादणे योग्य वाटतील अशा शर्तींच्या अधीनतेने, व्यक्तीला किंवा संस्थेला असे प्रयोग करणे चालू ठेवण्यास परवानगी देऊ शकेल. प्राण्यांवर प्रयोग करण्यास मनाई करण्याची शक्ती.

२०. कोणतीही व्यक्ती;— शास्ती.

(क) कलम १९ अन्वये, समितीने दिलेल्या कोणत्याही आदेशाचे व्यतिक्रमण करील ; किंवा

(ख) त्या कलमाखाली समितीकडून घालण्यात आलेल्या कोणत्याही शर्तीचा भंग करील ;

तर, ती व्यक्ती दोनशे रुपयांपर्यंत असू शकणाऱ्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस, आणि, जेव्हा कोणत्याही संस्थेच्या जागेत शर्तीचे अतिक्रमण किंवा भंग करण्यात आला असेल तेव्हा संस्थेची प्रभारी व्यक्ती अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल आणि तदन्वये ती शिक्षेस पात्र असेल.

## प्रकरण पाच

### खेळ करणारे प्राणी

२१. या प्रकरणामध्ये "प्रदर्शित करणे" याचा अर्थ, जेथे लोकांना तिकीट विक्रीमार्फत प्रवेश देण्यात येतो अशा कोणत्याही करमणुकीच्या कार्यक्रमात "प्रदर्शित करणे," असा आहे आणि "प्रशिक्षण देणे" याचा अर्थ, अशा कोणत्याही प्रदर्शनासाठी प्रशिक्षण देणे, असा आहे आणि प्रदर्शक व प्रशिक्षक या शब्दप्रयोगांचे अनुक्रमे तत्सम अर्थ असतील. "प्रदर्शित करणे" "प्रशिक्षण देणे" यांच्या व्याख्या.

२२. कोणतीही व्यक्ती,— खेळ करून दाखवणाऱ्या प्राण्यांचे प्रदर्शन व प्रशिक्षण यांवर निर्बंध.

(एक) या प्रकरणाच्या उपबंधानुसार खेळ करणाऱ्या कोणत्याही प्राण्यास, त्याची नोंदणी केलेली नसेल तर ;

(दोन) खेळ करणारा प्राणी म्हणून, ज्या प्राण्याला, केंद्र सरकार, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, प्रदर्शन करता न येणारा किंवा प्रशिक्षण देता न येणारा प्राणी म्हणून निर्दिष्ट करू शकेल, अशा कोणत्याही प्राण्याला खेळ करणारा प्राणी म्हणून,

—प्रदर्शित किंवा प्रशिक्षित करणार नाही.

२३. (१) खेळ करणाऱ्या कोणत्याही प्राण्याचे प्रदर्शन करण्यास किंवा त्याला प्रशिक्षण देण्यास इच्छुक असणाऱ्या प्रत्येक व्यक्तीची तिने विहित फी भरल्यावर, या प्रकरणाखाली न्यायालयाने दिलेल्या आदेशामुळे, ती अशी नोंदणी करण्यास हक्कदार नसणारी व्यक्ती नसेल तर, या अधिनियमाखाली नोंदणी करण्यात येईल. नोंदणी करण्याची पद्धती.

(२) या प्रकरणान्वये नोंदणी करण्यासाठी केलेल्या अर्जामध्ये, विहित करण्यात येईल त्याप्रमाणे प्राणी आणि प्राण्यांचा खेळ करून ज्या प्रकारे त्यांना प्रदर्शित करावयाचे आहे किंवा त्यांना प्रशिक्षण द्यावयाचे आहे त्याचे सर्वसाधारण स्वरूप, या तपशीलांचा समावेश असेल, आणि अशा प्रकारे देण्यात आलेल्या तपशीलाची नोंद विहित प्राधिकरणाकडून ठेवण्यात आलेल्या नोंदवहीत घेण्यात येईल.

(३) विहित प्राधिकरण, त्याने ठेवलेल्या नोंदवहीत ज्या व्यक्तीचे नाव आढळेल अशा प्रत्येक व्यक्तीस, नोंदवहीत नोंदलेला तपशील अंतर्भूत असणारे, विहित नमुन्यातील नोंदणी प्रमाणपत्र देईल.

(४) या प्रकरणाखाली ठेवण्यात आलेली प्रत्येक नोंदवही विहित फी भरल्यावर सर्व वाजवी वेळी निरीक्षणासाठी खुली राहील आणि कोणतीही व्यक्ती, विहित फी भरल्यावर तिची नक्कल घेण्यास किंवा त्यातून उतारे काढण्यास हक्कदार असेल.

(५) नोंदवहीमध्ये जिचे नाव असेल अशी कोणतीही व्यक्ती, या अधिनियमाखाली, कोणत्याही न्यायालयाने दिलेल्या कोणत्याही आदेशाच्या उपबंधाच्या अधीनतेने, नोंदवहीत नोंद करण्यात आलेल्या कोणत्याही तपशीलात फेरफार करण्यासाठी अर्ज करण्यास हक्कदार असेल आणि जेव्हा अशा कोणत्याही तपशीलात फेरफार करण्यात येईल तेव्हा विद्यमान प्रमाणपत्र रद्द करण्यात येईल आणि त्याला नवीन प्रमाणपत्र देण्यात येईल.

२४. (१) पोलीस अधिकाऱ्याने किंवा कलम २३ मध्ये निर्देशित केल्याप्रमाणे विहित प्राधिकरणाकडून लेखी प्राधिकृत करण्यात आलेल्या अधिकाऱ्याने कोणत्याही दंडाधिकाऱ्याकडे केलेल्या तक्रारीवरून, खेळ करणाऱ्या कोणत्याही प्राण्याला उगीचच वेदना किंवा यातना देऊन प्रशिक्षण दिले जात आहे किंवा त्याचे प्रदर्शन केले जात आहे आणि तसे करण्यास मनाई करणे किंवा केवळ शर्तींच्या अधीनतेने तसे करण्यास परवानगी देणे आवश्यक असल्याविषयी त्याची खात्री पटेल त्याबाबतीत न्यायालय, ज्या व्यक्तीच्याबाबतीत तक्रार करण्यात आलेली असेल त्या व्यक्तीविरुद्ध प्रशिक्षण देण्यास किंवा त्यांचे प्रदर्शन करण्यास मनाई करण्याशी किंवा त्यासंबंधात आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा शर्ती घालण्याशी संबंधित आदेश करू शकेल. खेळ करणाऱ्या प्राण्यांचे प्रदर्शन व प्रशिक्षण याला मनाई करण्याची किंवा त्यावर निर्बंध घालण्याची न्यायालयाची शक्ती.

(२) या कलमान्वये ज्या कोणत्याही न्यायालयाकडून आदेश देण्यात आला असेल ते न्यायालय, आदेश दिल्यानंतर होईल तितक्या लवकर आदेशाची पाठवावयाची एक प्रत, जिच्याविरुद्ध आदेश देण्यात आला आहे, त्या व्यक्तीची नोंदणी ज्याच्याकडून झाली असेल त्या विहित प्राधिकरणाकडे पाठवण्याची आणि त्या व्यक्तीने धारण केलेल्या प्रमाणपत्रावर आदेशाचा तपशील पृष्ठांकित करण्याची व्यवस्था करील आणि पृष्ठांकनाच्या प्रयोजनार्थ, न्यायालय तसे करण्यास फर्माविल तेव्हा ती व्यक्ती आपले प्रमाणपत्र सादर करील आणि या कलमान्वये ज्या विहित प्राधिकरणाकडे आदेशाची एक प्रत पाठवण्यात आली आहे ते प्राधिकरण त्या नोंदवहीत आदेशाच्या तपशीलाची नोंद घेईल.

जागेत प्रवेश करण्याची शक्ती.

२५. (१) कलम २३ मध्ये निर्देशित केलेल्या विहित प्राधिकरणाकडून लेखी प्राधिकृत करण्यात आलेली कोणतीही व्यक्ती आणि उपनिरीक्षकाच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेला कोणताही पोलीस अधिकारी,—

(क) ज्या कोणत्याही जागेत खेळ करून दाखवणाऱ्या ज्या कोणत्याही प्राण्यांना प्रशिक्षण दिले जात असेल किंवा ज्यांचे प्रदर्शन करण्यात येत असेल किंवा जेथे त्यांना प्रशिक्षण देण्यासाठी किंवा जेथे त्यांचे प्रदर्शन करण्यासाठी ठेवण्यात आले असेल अशा कोणत्याही जागेत आणि असे कोणतेही प्राणी जेथे सापडतील अशा कोणत्याही जागी, सर्व वाजवी वेळी, प्रवेश करू शकेल आणि त्या जागेचे निरीक्षण करू शकेल;

(ख) जी खेळ करून दाखवणाऱ्या प्राण्यांची प्रशिक्षक किंवा प्रदर्शक आहे, असे त्यास सकारण वाटत असेल अशा कोणत्याही व्यक्तीला तिचे नोंदणी प्रमाणपत्र हजर करण्यास तो फर्मावू शकेल ;

(२) पोट कलम (१) मध्ये निर्देशित केलेली कोणतीही व्यक्ती किंवा पोलीस अधिकारी, या कलमाखाली खेळ करणाऱ्या प्राण्यांचा सार्वजनिक ठिकाणी खेळ सुरू असताना मंचावर किंवा मंचाच्या मागे जाण्यास हक्कदार असणार नाही.

अपराध.

२६. कोणतीही व्यक्ती—

(क) या प्रकरणाखाली नोंदणीकृत नसून खेळ करणाऱ्या कोणत्याही प्राण्याचे प्रदर्शन करत असेल किंवा त्याला प्रशिक्षण देत असेल ; किंवा

(ख) या अधिनियमाखाली नोंदणीकृत असून, ज्याच्या बाबतीत किंवा ज्या पद्धतीने खेळ करून दाखवणाऱ्या प्राण्याचे प्रदर्शन करीत असेल किंवा त्याला प्रशिक्षण देत असेल तो प्राणी किंवा ती पद्धत यांच्या संबंधात ती नोंदणीकृत नसेल ; किंवा

(ग) कलम २२, खंड (दोन) अन्वये काढण्यात आलेल्या अधिसूचनेद्वारे, खेळ करून दाखवण्याच्या प्रयोजनार्थ वापरता येऊ न शकणाऱ्या कोणत्याही प्राण्यांचे प्रदर्शन करीत असेल किंवा त्याला प्रशिक्षण देत असेल ; किंवा

(घ) कलम २५ मध्ये निर्देशिलेली कोणतीही व्यक्ती किंवा पोलीस अधिकारी, या अधिनियमाखालील प्रवेश व निरीक्षण करण्याच्या शक्तींचा वापर करीत असताना, त्या व्यक्तीला किंवा पोलीस अधिकाऱ्याला अडथळा आणील किंवा बुद्धिपुरस्सर उशीर करील तर ; किंवा

(ङ) असे निरीक्षण टाळण्याच्या दृष्टीने कोणत्याही प्राण्याला दडवून ठेवील ; किंवा

(च) या अधिनियमाखाली नोंदणीकृत असून, या अधिनियमाला अनुसरुन, त्याचे या अधिनियमाखालील प्रमाणपत्र हजर करणे आवश्यक असेल तेव्हा तसे करण्यास कोणतीही वाजवी सबब असल्याशिवाय चुकेल ; किंवा

(छ) अशी नोंदणी करण्यास तो हक्कदार असेल, तेव्हा या अधिनियमाखाली नोंदणी करण्यासाठी अर्ज करील,

—तर ती व्यक्ती तिच्या दोषसिद्धीनंतर पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या किंवा तीन महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या कारावासाच्या किंवा दोन्ही शिक्षांस पात्र असेल.

सूट.

२७. या प्रकरणात अंतर्भूत असणारी कोणतीही गोष्ट,—

(क) खऱ्याखुऱ्या सैनिकी किंवा पोलिसी प्रयोजनासाठी प्राण्यांना प्रशिक्षण देण्यास किंवा असे प्रशिक्षण देण्यात आलेल्या कोणत्याही प्राण्याचे प्रदर्शन करण्यास ; किंवा

(ख) प्राणी उद्यानामध्ये ठेवलेल्या किंवा तिचा मुख्य उद्देश शैक्षणिक किंवा शास्त्रीय प्रयोजनांसाठी प्राण्यांचे प्रदर्शन करणे, असा आहे, अशा सोसायटी किंवा अधिसंघाने ठेवलेल्या कोणत्याही प्राण्यास,
—लागू होणार नाही.

## प्रकरण सहा

### संकीर्ण

२८. या अधिनियमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे कोणत्याही समाजाच्या धर्माने आवश्यक असलेल्या पद्धतीने कोणत्याही प्राण्याला ठार मारणे, हा अपराध ठरणार नाही. धर्माने विहित केलेल्या ठार मारण्याच्या पद्धती-संबंधीची व्यावृत्ती.

२९. (१) या अधिनियमाखाली कोणत्याही प्राण्याचा मालक, कोणत्याही अपराधासाठी सिद्ध दोषी आहे, असे आढळल्यास, न्यायालय, त्याच्या दोषसिद्धीनंतर त्याला योग्य वाटेल तर, अन्य कोणत्याही शिक्षादेशाच्या जोडीला, ज्या प्राण्याच्या बाबतीत अपराध केला गेला असेल त्या प्राण्याचे शासनाकडे समपहरण करण्यात येईल आणि त्याला योग्य वाटेल त्या परिस्थितीत, प्राण्याची विल्हेवाट लावण्यासंबंधी आणखी आदेश देऊ शकेल. सिद्ध दोषी व्यक्तीला प्राण्याच्या मालकी-पासून वंचित ठेवण्याची न्यायालयाची शक्ती.

(२) यापूर्वी या अधिनियमाखाली त्याचा दोष सिद्ध झाल्याचे किंवा मालकाच्या चारित्र्याचे किंवा अन्यथा प्राण्याला मालकाकडे ठेवल्यामुळे त्या प्राण्याला, आणखी क्रूरतेची वागणूक देण्यात येत आहे असे उघडकीस आल्याचे पुराव्याद्वारे दाखवून देण्यात आल्याखेरीज पोटकलम (१) अन्वये कोणताही आदेश देण्यात येणार नाही.

(३) पोटकलम (१) मधील उपबंधांना बाध न येता, न्यायालय, या अधिनियमान्वये अपराधाबद्दल सिद्धदोषी व्यक्तीला, कोणत्याही प्रकारच्या कोणत्याही प्राण्याला किंवा न्यायालयाला योग्य वाटल्यास आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल त्या कोणत्याही प्रकारच्या किंवा कोणत्याही जातीच्या कोणत्याही प्राण्याला एकतर कायमचे किंवा आदेशाद्वारे नियत करण्यात येईल अशा कालावधीत ताब्यात घेण्यास प्रतिबंध करण्याचा सुद्धा आदेश देऊ शकेल.

(४) (क) यापूर्वी दोष सिद्ध झाल्याचा किंवा उक्त व्यक्तीच्या चारित्र्याचा किंवा अन्यथा ज्या प्राण्यांच्या संबंधात ती दोषी असेल त्या प्राण्याला ताब्यात घेऊन उक्त व्यक्तीने त्या प्राण्याला क्रूरतेने वागविल्याचे उघडकीस आल्याचे पुराव्याद्वारे दाखवून देण्यात आले नसेल तर;

(ख) जिची दोषसिद्धी झाली होती तिच्यावर केलेल्या फिर्यादीत, फिर्यादी व्यक्तीने, आरोपी व्यक्तीची दोषसिद्धी करीत असताना, पूर्वोक्त आदेश देण्याची विनंती करण्याचा आपला हेतू आहे, असे नमूद केलेले नसेल तर ; आणि

(ग) ज्याच्या संबंधात सिद्धदोषी ठरवण्यात आले होते अशा प्रकारचा कोणताही प्राणी बाळगण्या-साठी, ज्या क्षेत्रात त्या त्या काळी अंमलात असलेल्या कायद्याखाली लायसन आवश्यक असते त्या क्षेत्रात ज्या अपराधाबद्दल सिद्धदोषी ठरवण्यात आले असेल असा तो अपराध नसेल तर, पोटकलम (३) खाली कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

(५) त्या त्या काळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात एतद्‌विरूद्ध काहीही अंतर्भूत असले तरी, पोटकलम (३) अन्वये ज्या कोणत्याही व्यक्तीच्या बाबतीत आदेश देण्यात आला आहे त्या व्यक्तीला दिलेल्या आदेशाच्या उपबंधाविरूद्ध कोणत्याही प्राण्याला ताब्यात घेण्याचा अधिकार असणार नाही आणि जर ती कोणत्याही आदेशाच्या उपबंधाचे व्यतिक्रमण करील तर, तो शंभर रुपयांपर्यंत असू शकेल एवढ्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस किंवा तीन महिन्यांपर्यंत असू शकेल एवढ्या कारावासाच्या शिक्षेस किंवा दोन्ही शिक्षांस पात्र असेल.

(६) पोटकलम (३) अन्वये ज्या कोणत्याही न्यायालयाने आदेश दिला असेल ते न्यायालय, स्वतः होऊन किंवा याबाबतीत त्याच्याकडे करण्यात आलेल्या अर्जावरून, कोणत्याही वेळी असा आदेश, विखंडीत करू शकेल किंवा त्यात फेरबदल करू शकेल.

३०. कोणत्याही व्यक्तीवर, तिने कलम ११, पोटकलम (१) खंड (झ) च्या उपबंधाविरूद्ध एखाद्या बोकडाला किंवा गाईला किंवा तिच्या प्रजनिताला ठार केले असल्याचा दोषारोप ठेवण्यात आला असेल आणि अपराध करण्यात आला असल्याचे अभिकथित असेल त्यावेळी, या कलमात निर्देशित केलेली अशा कोणत्याही प्राण्याची कातडी, आणि डोक्याला लागून असलेल्या कातडीचा कोणताही भाग त्या व्यक्तीच्या ताब्यात असेल तर, अशा प्राण्याला क्रूरतेने ठार मारण्यात आले होते याविरुद्ध काहीही सिद्ध होईतोपर्यंत तसे गृहित धरण्यात येईल. विवक्षित प्रकरणी दोषी असण्याचे गृहीतक.

३१. फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८ (१८९८ चा ५) यात काहीही अंतर्भूत असेल तरी कलम ११ च्या पोटकलम (१) च्या खंड (ठ) किंवा खंड (ट) किंवा खंड (ण) अन्वये किंवा कलम १२ अन्वये शिक्षापात्र असणारा एखादा अपराध त्या संहितेच्या अर्थांतर्गत दखलपात्र अपराध असेल. अपराधांची दखलपात्रता.

**झडती घेण्याच्या किंवा अभिग्रहणाच्या शक्ती.**

३२. (१) उपनिरीक्षकाच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसेल असा कोणताही पोलीस अधिकारी किंवा राज्य शासनाने याबाबतीत प्राधिकृत केलेली कोणतीही व्यक्ती जर तिला कलम ३० मध्ये निर्देशिलेल्या अशा कोणत्याही प्राण्याच्या बाबतीत कलम ११ पोटकलम (१) खंड (ञ) खालील अपराध कोणत्याही ठिकाणी घडत आहे किंवा घडण्याच्या बेतात आहे किंवा घडलेला आहे असे मानण्यास कारण असेल तर किंवा अशा कोणत्याही प्राण्याची कातडी आणि डोक्याला लागून असलेल्या कातडीचा कोणताही भाग कोणत्याही व्यक्तीच्या ताब्यात आहे असे मानण्यास कारण असेल तर असा पोलीस अधिकारी किंवा अशी व्यक्ती ज्या कोणत्याही जागेत अशा कोणत्याही प्राण्याची कातडी आहे असे मानण्यास तिला कारण असेल तर अशा कोणत्याही जागेत प्रवेश करू शकेल, आणि त्या जागेची झडती घेऊ शकेल आणि असा अपराध करताना वापरण्यात आलेल्या किंवा तो करण्याच्या उद्देशाने वापरण्यात आलेल्या कातडीचे किंवा वस्तूंचे किंवा गोष्टीचे अभिग्रहन करू शकेल.

(२) उपनिरीक्षकाच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसेल असा कोणताही पोलीस अधिकारी किंवा राज्य शासनाने यासंबंधात प्राधिकृत केलेली कोणतीही व्यक्ती जर तिला तिच्या अधिकारितेच्या मर्यादेत, येणाऱ्या कोणत्याही प्राण्यावर, [1][कलम १२ मध्ये निर्देशित करण्यात आलेली] फुका किंवा [1][डूमदेव किंवा अन्य कोणत्याही स्वरुपाची क्रिया] नुकतीच करण्यात आली असल्याचे किंवा ती करीत असल्याचे मानण्यास कारण असेल तर तो अधिकारी किंवा ती व्यक्ती असा प्राणी जेथे आहे असे मानण्यास त्यास कारण असेल अशा कोणत्याही ठिकाणी प्रवेश करू शकेल आणि प्राण्याचे अभिग्रहण करू शकेल आणि ज्या ठिकाणातून प्राण्याचे अभिग्रहण करण्यात आले असेल त्या ठिकाणच्या प्रभारी पशुवैद्यक अधिकाऱ्याकडे प्राणी परीक्षणासाठी हजर करू शकेल.

**झडतीचे अधिपत्र.**

३३. (१) प्रथम किंवा द्वितीय वर्गाच्या दंडाधिकाऱ्यास किंवा इलाखा दंडाधिकाऱ्यास किंवा उपविभागीय दंडाधिकाऱ्यास किंवा पोलीस आयुक्तास किंवा जिल्हा पोलीस अधीक्षकास, त्यास मिळालेल्या माहितीवरून आणि त्यास आवश्यक वाटेल अशी चौकशी केल्यानंतर कोणत्याही ठिकाणी या अधिनियम खाली अपराध घडत आहे किंवा घडण्याच्या बेतात आहे किंवा घडणार आहे असे मानण्यास कारण असेल तर तो एकतर स्वत: त्याठिकाणी प्रवेश करू शकेल आणि झडती घेऊ शकेल किंवा उपनिरिक्षकाच्या दर्जाहून कमी दर्जाचा नाही अशा कोणत्याही पोलीस अधिकाऱ्यास कोणत्याही ठिकाणी प्रवेश करण्यास किंवा झडती घेण्यास अधिपत्र काढून प्राधिकृत करू शकेल.

(२) फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८ (१८९८ चा ५) याचे झडत्या घेण्यासंबंधातील उपबंध जेथवर ते लागू करणे शक्य असेल तेथवर या अधिनियमाखाली घेण्यात येणाऱ्या झडत्यांना लागू होतील.

**परीक्षणासाठी अभिग्रहण करण्याची सर्वसाधारण शक्ती.**

३४. शिपायाच्या दर्जापेक्षा वरच्या दर्जाच्या कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याला किंवा शासनाने याबाबतीत प्राधिकृत केलेल्या व्यक्तीला, कोणत्याही प्राण्याच्या संबंधात करण्यात आलेला अपराध हा, या अधिनियमाविरूद्ध केला आहे किंवा केला जात आहे असे मानण्यास कारण असेल तर, तो अधिकारी किंवा ती व्यक्ती जर परिस्थितीनुसार तसे करणे आवश्यक आहे असे मानण्यास तिला कारण असेल तर, प्राण्याचे अभिग्रहण करू शकेल आणि त्याला नजीकच्या दंडाधिकाऱ्याकडे किंवा विहित करण्यात येईल त्या पशुवैद्यक अधिकाऱ्याकडे परीक्षणाकरता हजर करू शकेल आणि असा पोलीस अधिकारी किंवा प्राधिकृत व्यक्ती, जेव्हा प्राण्याचे अभिग्रहण करेल तेव्हा त्या प्रभारी व्यक्तीला प्राण्याबरोबर परीक्षणाच्या ठिकाणी जाण्यास फर्मावू शकेल.

**प्राण्यांवर उपचार करणे व त्यांची काळजी घेणे.**

३५. (१) राज्य शासन या अधिनियमाविरूद्ध ज्यांच्याबाबतीत अपराध करण्यात आला आहे त्या प्राण्यांवर उपचार करण्यासाठी व त्यांची काळजी घेण्यासाठी, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे रुग्णनिवास नेमून देऊ शकेल आणि कोणताही प्राणी दंडाधिकाऱ्यासमोर हजर केला जाईपर्यंत त्याला त्यामध्ये स्थानबद्ध करण्याचा प्राधिकार देऊ शकेल.

(२) ज्या दंडाधिकाऱ्यासमोर या अधिनियमाविरूद्ध करण्यात आलेल्या अपराधाबद्दल खटला दाखल करण्यात आला असेल तो दंडाधिकारी, संबंधित प्राण्याला नेहमीचे काम करण्यासाठी जोपर्यंत तो पात्र ठरत नाही किंवा अन्यथा त्याच्या मुक्ततेसाठी जोपर्यंत तो पात्र ठरत नाही तोपर्यंत त्याच्यावर उपचार करण्यासाठी किंवा त्याची देखरेख घेण्यासाठी त्याला रुग्णनिवासात ठेवण्याचा किंवा त्याला पांजरपोळात पाठवण्याचा किंवा तेथे प्राणी आढळेल त्या क्षेत्राच्या प्रभारी अधिकाऱ्याने किंवा या अधिनियमान्वये यासंबंधात करण्यात आलेल्या नियमांद्वारे प्राधिकृत करण्यात आलेल्या अशा अन्य पशुवैद्यक अधिकाऱ्याने तो यातून बरा होणे शक्य नाही किंवा क्रूरतेने मारल्याशिवाय त्याचा नाश होणार नाही, असे प्रमाणित केले तर त्याला ठार मारण्यात यावे; असा निदेश देऊ शकेल.

(३) काळजी घेण्याकरता व उपचाराकरीता रुग्णनिवासात पाठवण्यात आलेल्या प्राण्याला दंडाधिकाऱ्याने त्याला पांजरपोळात टाकण्यात यावे किंवा मारून टाकण्यात यावे असा निर्देश दिलेला नसेल तर, ज्याठिकाणी रुग्ण निवास आहे त्या क्षेत्राच्या प्रभारी पशुवैद्यक अधिकाऱ्याने किंवा या अधिनियमाअन्वये अशा यासंबंधात करण्यात आलेल्या नियमाद्वारे प्राधिकृत करण्यात आलेल्या अशा अन्य पशुवैद्यक अधिकाऱ्याने त्याची मुक्तता करण्यास तो पात्र असल्याचे प्रमाणपत्र दिल्याखेरीज, त्याची मुक्तता करता येणार नाही.

---

१. १९८२ चा अधिनियम २६, कलम १५ द्वारे "डूमदेव" या शब्दांऐवजी घातले.

(४) प्राण्याला रुग्णनिवासात किंवा पांजरपोळात नेताना होणारा परिवहनाचा आणि रुग्णनिवासात करण्यात येणारा त्याच्या परिरक्षणाचा आणि उपचाराचा खर्च हा जिल्हा दंडाधिकाऱ्याने किंवा इलाखा शहरामध्ये पोलीस आयुक्ताने विहित करावयाच्या दराच्या प्रमाणानुसार प्राण्याच्या मालकाकडून भरण्यात येईल :

परंतु, दंडाधिकारी, प्राण्याच्या मालकाच्या गरिबीमुळे तसा आदेश देईल त्याबाबतीत प्राण्याच्या उपचारासाठी येणारा खर्च त्याला भरावा लागणार नाही.

(५) पोटकलम (४) अन्वये प्राण्याच्या मालकाकडून देय असलेली कोणतीही रक्कम जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे वसूल करण्यात येईल.

(६) दंडाधिकारी विनिर्दिष्ट करेल अशा मुदतीच्या आत मालकाने प्राण्याला हलविण्यास नकार दिला किंवा हयगय केली तर, दंडाधिकारी प्राण्याला विकावे आणि विक्रीच्या उत्पन्नातून असा खर्च भागवावा असा आदेश देऊ शकेल.

(७) अशा विक्रीच्या उत्पन्नातील शिल्लक, कोणतीही असल्यास, विक्रीच्या दिनांकापासून दोन महिन्यांच्या आत मालकाने अर्ज केल्यास त्याला देण्यात येईल.

३६. या अधिनियमाविरूद्ध केलेल्या अपराधाबद्दल भरावयाचा खटला हा, अपराध घडल्यापासून तीन महिन्यांची मुदत समाप्त झाल्यानंतर दाखल करता येणार नाही. खटला भरण्यावरील मर्यादा.

३७. केंद्र सरकार, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे या अधिनियमाअन्वये त्याला वापरता येण्याजोग्या सर्व किंवा कोणत्याही शक्ती त्याला लादणे योग्य वाटतील अशा शर्तींच्या अधीनतेने, कोणत्याही राज्य शासनाला सुद्धा वापरता येईल, असे निर्देशित करू शकेल. शक्तींचे प्रत्यायोजन.

३८. (१) केंद्र सरकारला, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे आणि पूर्व प्रकाशनाच्या शर्तींच्या अधीनतेने, या अधिनियमाअन्वये प्रयोजने पार पाडण्यासाठी नियम करता येतील. नियम करण्याची शक्ती.

(२) विशेषत: आणि पूर्वगामी शक्तीच्या व्यापकतेस बाध न येता केंद्र सरकार, पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही बाबींसाठी नियम करू शकेल, त्या बाबी खालीलप्रमाणे :—

(क) मंडळाच्या सदस्यांच्या [1][ * * * ] सेवाशर्ती, त्यांना देय असणारे भत्ते आणि ज्या रीतीने ते आपल्या शक्तीचा वापर करू शकतील आणि आपली कामे पार पाडू शकतील, ती रीत ;

[2][(कक) कलम ५ च्या पोटकलम (१) च्या खंड (ङ) अन्वये ज्या रीतीने महानगरपालिकेचे प्रतिनिधित्व करण्याकरता व्यक्तीला निवडून देता येईल, ती रीत ; ]

(ख) कोणत्याही प्राण्याने वाहून किंवा ओढून न्यावयाचा जास्तीत जास्त भार (यात प्रसंगवशात् प्राण्यांच्या वजनाचा कोणताही भार अंतर्भूत आहे);

(ग) प्राण्यांच्या अतिगर्दीला प्रतिबंध करण्याकरिता पाळावयाच्या शर्ती ;

(घ) कोणत्याही वर्गाच्या प्राण्यांचा ज्या कालावधीमध्ये व ज्या तासामध्ये जुंपण्याकरता उपयोग करता येणार नाही तो कालावधी व ते तास ;

(ङ) प्राण्यांना क्रूरतेने वागवण्यासाठी कोणत्याही लगामाचा उपयोग करण्यास किंवा लगामाला जुंपण्यास करावयाचा प्रतिबंध ;

[3][(ङक) कलम ११ च्या पोटकलम (३) च्या खंड (ख) मध्ये निर्दिष्ट केल्याप्रमाणे बेवारशी कुत्र्यांचा नाश करण्याच्या अन्य पद्धती ;

(ङख) ज्याला क्रूरतेशिवाय हलविले जाणे शक्य नसेल अशा कोणत्याही प्राण्याला कलम १३ च्या पोटकलम (३) अन्वये ज्या पद्धतीने नष्ट करता येईल त्या पद्धती ; ]

(च) विहित करण्यात येईल अशा प्राधिकरणाने नाल बसवण्याचा व्यवसाय करणाऱ्या व्यक्तीला द्यावयाचा परवाना व त्याची करावयाची नोंदणी आणि आकारावयाची फी ;

(छ) विक्री, निर्यात किंवा अन्य कोणत्याही प्रयोजनासाठी प्राण्यांना पकडताना बाळगावयाची सावधगिरी आणि केवळ या प्रयोजनाकरिता वापरता येणारी उपकरणे किंवा साधने आणि अशा रीतीने त्यांना पकडण्यासाठी द्यावयाचे लायसन आणि अशा लायसनकरिता आकारावयाची फी ;

---

१. १९८२ चा अधिनियम २६, कलम १६ (क) (एक) द्वारे "अटी आणि" हे शब्द वगळले (३० जुलै, १९८२ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम १६ (क) (दोन) द्वारे घातले (३० जुलै, १९८२ रोजी व तेव्हापासून.)

३. वरील अधिनियमाच्या कलम १६ (क) (तीन) द्वारे घातले (३० जुलै, १९८२ रोजी व तेव्हापासून.)

(ज्) प्राण्यांचे परिवहन—मग ते रेल्वेने, रस्त्यावरून अंतर्देशिय जलमार्गाने, जहाजाने किंवा विमानाने केलेली असो-करीत असताना बाळगावयाची सावधगिरी आणि ज्या रीतीने व ज्यातून त्यांची असे परिवहन करता येईल तो पिंजरा किंवा अन्य पात्र ;

(झ्) ज्या वास्तूमध्ये प्राण्यांना ठेवले आहे, जाते किंवा जेथे त्यांचे दूध काढले जाते अशा वास्तूच्या मालकाला किंवा प्रभारी व्यक्तीला अशा जागेची नोंदणी करण्यास अशा जागेच्या हद्दीची भिंत किंवा अशा वास्तूच्या सभोवतालचा भाग यासंबंधात करण्यात आलेल्या शर्तींचे अनुपालन करण्यास, अधिनियमाखाली तेथे कोणताही अपराध करण्यात आला आहे किंवा करण्यात येत आहे का हे ठरवण्याच्या प्रयोजनार्थ तिचे निरीक्षण करण्याची परवानगी देण्यास आणि अशा जागांमध्ये तेथील लोकांना सामान्यपणे समजू शकेल अशा एका भाषेतील किंवा भाषांतील कलम १२ च्या प्रती प्रदर्शित करण्यास फर्माविणे ;

(ञ्) प्रकरण ५ अन्वये ज्या नमुन्यात नोंदणीसाठी अर्ज करता येतील तो नमुना, त्यात समाविष्ट करावयाचा तपशील, अशी नोंदणी करण्यासाठी देय असणारी फी, आणि ज्या प्राधिकरणाकडे असे अर्ज पाठवता येतील ते प्राधिकरण ;

[1][(ञ्क) प्राण्यांवर प्रयोग करणाऱ्या व्यक्ती किंवा संस्था यांची नोंदणी करण्याकरिता किंवा अन्य कोणत्याही प्रयोजनाकरता कलम १५ अन्वये घटित करण्यात आलेली समिती, आकारू शकेल ती फी ; ]

(ट्) या अधिनियमाअन्वये ज्या प्रयोजनांसाठी दंड वसुली लागू होऊ शकेल ती प्रयोजने अशा प्रयोजनांमध्ये उपचारगृहे, पांजरपोळ आणि पशुवैद्यकीय अपंगालय यांचे परिरक्षण यांसारख्या प्रयोजनांचा समावेश असेल ;

(ठ) जी विहित करावयाची असेल किंवा विहित करता येऊ शकेल अशी अन्य कोणतीही बाब.

(३) जी कोणतीही व्यक्ती, या कलमाखाली केलेल्या कोणत्याही नियमांचे व्यतिक्रमण करेल किंवा करण्यास अपप्रेरणा देईल तर ती, शंभर रुपयांपर्यंत असू शकेल एवढ्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस किंवा तीन महिन्यांपर्यंत असू शकेल एवढ्या कारावासाच्या शिक्षेस किंवा दोन्ही शिक्षांस पात्र असेल.

[2][ * * * * ]

संसदेपुढे ठेवावयाचे नियम व विनियम.

[3][३८क. केंद्र सरकारने किंवा कलम १५ खाली घटित करण्यात आलेल्या समितिने केलेला प्रत्येक नियम आणि मंडळाने केलेला प्रत्येक विनियम तो करण्यात आल्यानंतर होईल तितक्या लवकर, संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर, ते एका सत्राने बनलेल्या अथवा दोन किंवा अधिक क्रमवर्ती सत्रे मिळून बनलेल्या अशा एकूण तीस दिवसांच्या कालावधीकरिता सत्रासीन असताना ठेवला जाईल आणि पूर्वोक्त सत्राच्या किंवा क्रमवर्ती सत्राच्या पाठोपाठचे सत्र संपण्यापूर्वी जर, ज्या नियमात किंवा विनियमात कोणतेही आपरिवर्तन करण्याबाबत दोन्ही सभागृहाचे मतैक्य झाले अथवा तो नियम किंवा विनियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर, त्यानंतर तो नियम किंवा विनियम अशा आपरिवर्तित स्वरूपातच परिणामकारक होईल किंवा, यथास्थिति, मुळीच परिणामक होणार नाही. तथापि, अशा कोणत्याही आपरिवर्तनामुळे किंवा शून्यीकरणामुळे तत्पूर्वी त्या नियमाखाली किंवा विनियमाखाली करण्यात आलेली कोणतीही गोष्ट तिच्या विधिग्राह्यतेला बाध येणार नाही.]

कलम ३४ अन्वये प्राधिकृत केलेल्या व्यक्ती लोकसेवक असणे.

३९. राज्य शासनाने, कलम २४ अन्वये प्राधिकृत केलेली प्रत्येक व्यक्ती ही, भारतीय दंड संहिता (१८६० चा ४५) हिच्या कलम २१ च्या अर्थानुसार लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल.

क्षतिपूर्ती.

४०. भारतीय दंड संहितेच्या कलम २१ च्या अर्थान्तर्गत जी कोणतीही व्यक्ती लोकसेवक आहे किंवा जिला लोकसेवक मानण्यात आले आहे तिने या अधिनियमाखाली सद्भावपूर्वक केलेल्या किंवा करण्याचे उद्देशित असलेल्या कोणत्याही गोष्टीबाबत त्या व्यक्तीविरूद्ध कोणताही दावा, खटला किंवा अन्य न्यायालयीन कार्यवाही केली जाणार नाही.

१८९० चा अधिनियम, ११ याचे निरसन.

४१. या अधिनियमाच्या कलम १ पोटकलम (३) अन्वये काढण्यात आलेल्या अधिसूचनेस अनुसरून या अधिनियमाचा कोणताही उपबंध कोणत्याही राज्यात अंमलात असेल त्याबाबतीत प्राण्यांना क्रूरतेने वागवण्यास प्रतिबंध अधिनियम, १८९० (१८९० चा ११) याच्या अंमलात असलेल्या उपबंधाशी समनुरुप असलेला कोणताही उपबंध त्यानंतर निरसित ठरेल.

---

१. १९८२ चा अधिनियम २६, कलम १६ (क्) (चार) द्वारे घातले (३० जुलै, १९८२ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम १६ (ख्) द्वारे पोटकलम (४) वगळले (३० जुलै, १९८२ रोजी व तेव्हापासून).

३. वरील अधिनियमाच्या कलम १७ द्वारे घातले (३० जुलै, १९८२ रोजी व तेव्हापासून).

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई